**प्रेस प्रकाशन**

## स्टेट ऑफ वर्किंग इंडिया: कोविड-१९ चे एक वर्ष

### कोरोनाविषाणूमुळे अचानक, बहुतांश कामगारांच्या कमाईत घट झाली आहे व दारिद्र्यात वाढ झाली आहे

**बेंगलुरू, 5 मे, 2021 – "स्टेट ऑफ वर्किंग इंडिया 2021:** कोविड -१९ चे एक वर्ष " हा रिपोर्ट आजिम प्रेमजी युनिव्हर्सिटीतर्फे ५ मे रोजी प्रकाशित झाला. संपूर्ण रिपोर्ट ऑनलाईन उपलब्ध आहे.

प्रकाशन कार्यक्रमाचा व्हिडिओ **YouTube** वर बघता येईल. हा रिपोर्ट भारतात कोविड -१९ मुळे रोजगार,उत्पन्न,असमानता आणि दारिद्र्य ह्यांच्यावर काय परणाम झाला ह्याचे संशोधन करतो आणि आतापर्यंत हाती घेतलेल्या उपाययोजनांच्या प्रभावीपणाची तपासणी करतो. शेवटी,हे पाहता की भारत आणखी एका प्राणघातक दुसऱ्या कोरोनाच्या लाटेच्या मध्ये आहे, हा रिपोर्ट जवळच्या आणि मध्यम-मुदतीच्या भविष्यासाठी काही धोरणात्मक सूचना देतो.

अझीम प्रेमजी विद्यापीठाचे कुलगुरू,अनुराग बेहार यांनी याकडे लक्ष वेधले की, "करोनाने एक प्रणालीगत आणि नैतिक अपयश उघडकीस आणले आहे. जे सर्वात असुरक्षित आहेत ते नेहमीच सर्वात मोठी किंमत मोजतात. हे मुळात बदलले गेले पाहिजे. हा रिपोर्ट या दिशेत एक छोटासा प्रयत्न आहे. तो करोनाच्या पहिल्या वर्षाच्या माहितीचे विश्लेषण करतो ज्यात जवळच्या भविष्या बद्दल आणि मध्यमकाळा बद्दल धडे मिळतात".

या रिपोर्टमध्ये असे दिसून आले आहे की करोना मुळे अनौपचारिकतेत(**informal**) आणखी वाढ झाली आहे व बहुतेक कामगारांच्या कमाईत घट झाल्यामुळे गरिबीत अचानक वाढ झाली आहे. महिला आणि तरूण कामगारांवर जास्त परिणाम झाला आहे. अनेक कुटुंबांना अन्नाचे प्रमाण कमी करावे लागले आहे, कर्ज घ्यावे लागले आहेत आणि संपत्ती विकावी लागली आहे. सरकारी मदतीमुळे गंभीर प्रकारची संकटे टाळण्यास मदत झाली आहे,परंतु आधारभूत उपायांची पोहोच अपूर्ण आहे,ज्यामुळे काही अत्यंत असुरक्षित कामगार आणि कुटुंबे वंचित राहिले आहेत.

या रेपोर्टचे मुख्य लेखक अमित बसोले म्हणाले की,"सरकारकडून अतिरिक्त मदतिची तातडीने आवश्यकता दोन कारणांसाठी आहे- पहिल्या वर्षात झालेल्या नुकसानाची भरपाई करणयासाठी आणि दुसऱ्या लाटेच्यापरिणामाची तयारी म्हणून. जूनच्या नंतर सुद्धा अविरत मोफत राशन, अतिरिक्त कॅश ट्रान्सफर्स,विस्तारित मनरेगा आणि शहरी नोकरी कार्यक्रम ह्या सर्व योजनांचा तयारी प्रयत्नात समावेश असू शकतो."

रेपोर्टचे मुख्य निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

### १. जून २०२० मध्ये लोकांना रोजगार आणि उत्पन्न परत मिळाले परंतु पूर्वपदा वर नाही येऊ शकले

ए. एप्रिल ते मे **2020** या दरम्यान देशभरात सुमारे १० कोटी लोक बेरोजगार झाले. ह्यांच्यापैकी बहुतेकांना जून २०२० पर्यंत रोजगार परत मिळाले, पण २०२० च्या अखेरीस सुद्धा सुमारे १५ लाख कामगार बेरोजगार राहिले. उत्पन्नही करोनाकाळाच्या

आधीच्या मानाने कमीच राहिले. सरासरी मासिक घरगुती आवक ऑक्टोबर २०२० मध्ये (₹४,९७९) हे जानेवारी २०२० (₹5,989) च्या पातळीपेक्षा खालीच होते.

बी. ज्या राज्यांमध्ये सरासरी कोविड केसेस चा भार जास्त होता तिथे बेरोजगारीचा परिणाम जास्त जाणवला. महाराष्ट्र,केरळ, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि दिल्ली, ह्यांना बेरोजगारीचा सर्वात जास्त फटका बसला.

सी. लोकडाऊनच्या निर्बंधांमुळे आर्थिक व्यवहार कमी झाले ज्यामुळे उत्पन्नाचे नुकसान झाले. आम्हाला असे सापडते की लॉकडाऊन संबंधी संचारबंदीच्या **10%** घटी मुळे उत्पन्नात **7.5%** घट झाली. ही संख्या भविष्यातील लॉकडाउनच्या प्रभावाचा अंदाज घेत असताना उपयुक्त राहील.

**२. महिला आणि तरूण कर्मचाऱ्यांवर सर्वात जास्त परिणाम झाला आणि बरेच लोक वर्षाच्या अखेरीस सुद्धा कामावर परत येऊ शकले नाहीत**

ए. लॉकडाऊन दरम्यान आणि त्यानंतरच्या महिन्यांत **61%** पुरुष कामगार सेवायोजित राहिले, **7%** कामगारांनी रोजगार गमावला आणि कामावर परतू शकले नाहीत. महिलांमध्ये केवळ १९%च सेवानियोजीत राहिल्या आणि लॉकडाऊन दरम्यान **47%** महिलांना कायमस्वरूपी नोकरी गमवावी लागली, ह्यांना २०२० च्या अखेरीस सुद्धा कामावर परतता आले नाही.

बी. तरुण कामगारांवर बेरोजगारीचा जास्त परिणाम झाला व हा परिणाम तीव्र आणि कायमस्वरूपी होता. **15-24** वर्षे ह्या वयोगटातील **33%** कामगार डिसेंबर २०२० पर्यंत रोजगार पुनर्प्राप्त करण्यात अयशस्वी ठरले. **25-44** वयोगटासाठी ही संख्या फक्त **6%** होती.

**३. अनौपचारिक रोजगारामध्ये मोठी वाढ झाली**

लॉकडाउननंतर कामगार अधिक अनिश्चित आणि अनौपचारिक स्वरूपाच्या रोजगारात परत आले. २०१९ अखेर ते २०२० अखेरच्या दरम्यान, नियमित पगार कमावणाऱ्या कामगारांपैकी जवळजवळ निम्मे अनौपचारिक कामात गेले- ह्यापैकी स्वयंरोजगारात ३०%, रोजंदारीत १०% आणि अनौपचारिक नोकऱ्यांमध्ये ९% कामगार गेले.

**४. गरीब कुटुंबांवर सर्वाधिक परिणाम झाला आणि दारिद्र्य आणि आर्थिक असमानता वाढली आहे.**

ए. एप्रिल आणि मे मध्ये, सर्वात गरीब **20%** कुटुंबांनी संपूर्ण उत्पन्न गमावले. याउलट श्रीमंत कुटुंबांना त्यांच्या उत्पन्नात कोरोना आधीच्या काळाच्या तुलनेत केवळ एक चतुर्थांशपेक्षा कमी प्रमाणाचा तोटा सहन करावा लागला. संपूर्ण आठ महिन्यांच्या कालावधीत (मार्च ते ऑक्टोबर), सरासरी, सर्वात गरीब **10%** कुटुंबांने **₹15,700** म्हणजेच तब्बल दोन महिन्यांचे उत्पन्न गमावले.

बी. नॅशनल मिनिमम वेज खाली असलेल्या व्यक्तींच्या संख्येत (**₹ 375** प्रति दिवस, अनूप सत्पती समितीनुसार) २३ कोटींनी वाढ झाली. ह्यामुळे ग्रामीण उत्पन्न-गरिबी दरात (**income poverty rate**) **15** टक्क्यांनी वाढ झाली आणि शहरी भागांमध्ये हा आकडा जवळजवळ २० टक्के होता .

**५. अन्नधान्याचे प्रमाण कमी करून व कर्ज घेऊन कुटुंबांनी कोरोना चा सामना केला**

कुटुंबाने दैनन्दिन अन्न सेवनाचे प्रमाण कमी करून , मालमत्तांची विक्री करुन आणि त्यातून अनौपचारिकपणे कर्ज घेऊन (मित्र, नातेवाईक आणि सावकार) कोरोना चा सामना केला. अझीम प्रेमजी युनिव्हर्सिटी कोविड लाइव्हलिहूड फोन सर्व्हे प्रमाणे **90** टक्के लोकांनी लॉकडाउन मध्ये अन्नधान्यात घट झाली असल्याचे सांगितले. त्याहूनही चिंताजनक म्हणजे लॉकडाऊनच्या सहा महिन्यांनंतरही २० टक्के प्रतिवाद्यानी सांगितले की सेवनात सुधारणा झाली नव्हती.

## ६. सरकारी मदतीचा उपयोग झाला परंतु अनेक कुटुंबे वगळली गेली

रिपोर्ट मागील वर्षाच्या समर्थन पॅकेजेसच्या अन्न आणि कॅश घटकांच्या आवाक्यावर सर्वेक्षण पुराव्यांची नोंद करते . पीडीएस चे कव्हरेज जन-धन च्या सध्या च्या कव्हरेज पेक्षा बरेच जास्त आहे. अनेक सर्वेक्षणांमध्ये, जवळपास ९०% कुटुंबांकडे रेशनकार्ड होते परंतु सुमारे ५०% कुटुंबांकडे जनधन खाते होते. मात्र , पीएमजीकेवायची (**PMGKY**) कार्यक्षमता दोन्ही प्रकारच्या मदत उपायांसाठी समान होती. इंडिया वर्किंग सर्वे मध्ये (ऑगस्ट ते सप्टेंबर २०२० मध्ये कर्नाटक आणि राजस्थानमधे झालेले, मोठ्या प्रमाणात ग्रामीण असलेले सर्वेक्षण) असे दिसून आले आहे की, पात्रतेची अट धरून म्हणजेच प्रायोरिटी राशन कार्ड असलेल्या **65%** कार्डधारकांना काही प्रमाणात पीएमजीकेवाय वाटप (म्हणजे नेहमीच्या कोटापेक्षा जास्त धान्य) मिळाले तर **35%**ना नेहमीचा पीडीएस कोटा (अतिरिक्त धान्य नाही) प्राप्त झाला. कॅश ट्रान्सफर्स साठी , स्त्रियांच्या मालकीचे जनधन खाते असलेयांपैकी **60%** कुटुंबांना एक किंवा अधिक ट्रान्सफर प्राप्त झाल्या, जवळजवळ **30%**ना कोणत्याही ट्रान्सफर प्राप्त झाल्या नाहीत (आणि **10%** कुटुंबांना माहिती नव्हती).

## 7. संकटांतून खंबीरपणे बाहेर येण्याकरता मोठया निर्णयांची आवश्यकता आहे

ए. आतापर्यंत, कोविड -१९ ला तोंड देण्यासाठी भारताचा वित्तीय प्रतिसाद कमकुवत आहे. दुसऱ्या लाटेचा परिणाम अद्याप उलगडत आहे आणि हा परिणाम आम्ही पहिल्या लाटेसाठी नोंदवलेल्या परिणामाइतकाच किंवा त्यापेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. कर्ज, पर्यायांचा अभाव आणि कमी झालेली बचतीच्या पार्श्वभूमीवर येत असताना, दुसऱ्या लाटेचा परिणाम रोजगार, उत्पन्न, अन्न सुरक्षितता, शिक्षण आणि आरोग्यावर मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. करोना च्या मुकाबल्यात आघाडीवर असलेल्या राज्य सरकारांचे वित्तपुरवठे अत्यंत ताणले गेले आहेत. ह्या कारणास्तव केंद्र सरकारने आता अतिरिक्त खर्च करण्याची गरज आहे.

बी. आम्ही खालील धोरणे उपाय प्रस्तावित करतो -

- पीडीएसअंतर्गत कमीतकमी २०२१ च्या अखेरीस पर्यंत मोफत राशन वाढविणे.

- जास्तीत जास्त असुरक्षित कुटुंबांना तीन महिन्यांकरिता **5,000** रुपये कॅश ट्रान्सफर (केवळ जनधन मार्फत नव्हे तर इतर मार्गांनी सुद्धा)

- मनरेगाच्या अधिकाराची **150** दिवसांपर्यंत मुदतवाढ आणि कार्यक्रम वेतन सुधारित करणे (राज्यांच्या किमान वेतनाइतके). कार्यक्रमाचे बजेट किमान **₹ 1.75** लाख कोटी पर्यंत वाढवणे .

- कोरोनामुळे सर्वाधिक बाधित झालेल्या जिल्ह्यांमध्ये पायलट बेसिसवर शहरी रोजगार कार्यक्रम सुरू करणे आणि कार्यक्रमाच्या अंतर्गत महिला कामगारांना प्राधान्य देणे.

- वृद्धांच्या पेन्शन स्कीम मध्ये केंद्र सरकारचे योगदान कमीतकमी **₹ 500** पर्यंत वाढवणे.

- बिल्डिंग अँड अदर कन्स्ट्रक्शन वर्कर्स (बीओसीडब्ल्यू) कायद्यांतर्गत बांधकाम केलेल्या सर्व मनरेगा कामगारांना नोंदणीकृत कामगार म्हणून स्वयंचलितपणे नावनोंदणी करणे ज्यामुळे ते सामाजिक सुरक्षा फायद्यांचा लाभ घेऊ शकतील.

- २५ लाख अंगणवाडी व **ASHA** कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांकरता ३०००० रुपयांचा कोविड त्रास भत्ता (**hardship allowance)** (मासिक ५००० रुपये) .

या उपाययोजना एकत्र केल्याने अंदाजे ५.५ लाख कोटी अतिरिक्त खर्च आणि कोविडला तोंड देण्यासाठी एकूण वित्तीय प्रमाण दोन वर्षांत जीडीपीच्या **4.5.%** पर्यंत पोहोचेल . आमचा विश्वास आहे की ही मोठी वित्तीय आकडेवारी संकटाच्या महत्वानुसार गरजेची आहे. उदाहरणार्थ, कॅश ट्रान्सफर हे केवळ सर्वात गरीब **10%** कुटुम्बांने गेल्या वर्षी गमावलेल्या उत्पन्नाइतकेच आहे, दुसऱ्या लाटेचा प्रभाव ह्यात मोजला गेला नाही आहे .

सी. आता हे उपाय नाही केले तर येणाऱ्या दिवसांची अडचण कायम राहील आणि पुढे जाऊन ती आणखीनच वाढेल. दीर्घकालीन परिणाम आताच्या नुकसानीमुळे आणखी वाढतील. वाढलेले दारिद्र्य तसेच बचतीत नुकसानीमुळे पुढे जाऊन दारिद्र्याचे चक्र तयार होऊ शकते. घरगुती आर्थिक तणावामुळे, पौष्टिक आणि शैक्षणिक बिघाड उद्भऊन दीर्घकालीन परिणाम होऊ शकतात. महिलांवर झालेल्या परिणामामुळे लिंगाधारित फरक जो आधीच मोठा आहेय त्यात कालांतराने वाढ होऊ शकते. तरुण कामगारांना देखील या गमावलेल्या वर्षांमुळे कमाई आणि उत्पादकता यावर दीर्घकालीन परिणाम जाणवू शकतात.

आम्हाला आशा आहे की या रिपोर्ट मध्ये सादर केलेले विश्लेषण आगामी काळात धोरणात्मक निर्णयांमध्ये आधार देईल.

**For media queries contact:**

Amit Basole – amit.basole@apu.edu.in | +91-96196 49958

Rosa Abraham – rosa.abraham@apu.edu.in | +91-99019 57009

Shivani Naik – shivani.naik@k2communications.in | +91 97498 97597

**About Azim Premji University**

Azim Premji University was established as a not-for-profit, private university under the Azim Premji University Act 2010. The University has a clear social purpose of working towards a just, equitable, humane and sustainable society. Azim Premji University plays a critical role in developing new talent, building capacity in existing functionaries and creating domain knowledge in the fields of education and in development. The Azim Premji Foundation is the sponsor of the University. The roots of Azim Premji University lie in the learning and experience of a decade of work in elementary education by Azim Premji Foundation. The University is one of the Foundation’s key responses to the challenges confronting the education and development sectors in India.